दैनिक

# लक्ष महाराष्ट्र

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : २७५ वा | सोमवार दि. ३१ जुलै २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

## विरोधी पक्षनेता ठरेल त्या दिवशी काँग्रेसमध्ये स्फोट होईल : दरेकर



**मुंबई ।** विधानसभेचा विरोधी पक्षनेता ठरेल त्या दिवशी काँग्रेसमध्ये स्फोट होईल, असा दावा भाजप नेते प्रविण दरेकर यांनी केला आहे. काँग्रेसचे अनेक आमदार भाजपच्या संपर्कात आहेत. २४ नाही तर ४८ जागा आमची महायुती जिंकेल, असंही प्रविण दरेकर यांनी म्हटलं आहे. जे स्वतःचा विरोधी पक्षनेता ठरवू शकत नाही ते २४ जागा कशा जिंकणार? त्यांच्या पक्षातच एकमत आणि समन्वय नाही. विरोधी पक्षनेता ठरवू शकत नाही ही त्यांची हतबलता आहे, अशी टीका प्रविण दरेकर यांनी काँग्रेसवर केली आहे.

## न्यूज कॉलम

### झुलेलाल सोसायटीत वॉल कंपाऊंडचे उद्घाटन

**धुळे ।** शहरातील साक्री रोडवरील प्रभाग क्रमांक १५ मधील झुलेलाल सोसायटीत ओपन स्पेसला जिल्हा नियोजन मंडळ अंतर्गत सुमारे २५ लाख रुपये किमतीचे मोकळ्या भूखंडावर वॉल कंपाऊंड काम होत आहे. या कामाचे उद्घाटन नगरसेविका तथा जिल्हा नियोजन मंडळ सदस्य श्रीमती सुशीला ईशी यांच्या हस्ते करण्यात आले. बऱ्याच वर्षापासून प्रलंबित असलेले वॉल कंपाऊंड चे काम मार्गी लागल्यामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले. परिसराच्या वतीने नगरसेविका सुशीला ईशी यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित बसपाचे नेते योगेश ईशी, भूषण कटारिया, प्रवीण मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

### आयटीआर फाईलसाठी आज शेवटची मुदत

**मुंबई ।** आयटीआर दाखल करण्यासाठी दिलेली ३१ जुलै ही शेवटची मुदत आज संपणार आहे. त्यामुळे नागरिकांनी आज आपले आयटीआर दाखल करून भविष्यात होणारे नुकसान टाळावे असे आवाहन सरकारतर्फे करण्यात आले आहे. कुठल्याही ऑनलाईन सेवा केंद्र व सेंटर्सवरून नागरिक आपले आयटीआर अर्ज दाखल करू शकतात.

# सहकार चळवळ टिकावी यासाठी सामुहिक प्रयत्न आवश्यक- ना.भुजबळ

### सहकार मित्र पुरस्काराचे झाले वितरण

**त्र्यंबकेश्वर । प्रतिनिधी**



राज्यातील सहकार क्षेत्राने देशाला दिशा दिली आहे. मात्र या सहकार क्षेत्रात काही मंडळींनी स्वाहाकार केल्याने राज्यातील सहकार अडचणीत आले आहे. त्यामुळे अडचणीत आलेला हा सहकार पुन्हा वाढवायचा असेल तसेच ही चळवळ टिकावी यासाठी तर सर्वांनी एकत्रित येऊन सामुहिक प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. असे आवाहन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले आहे.

राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन पुणे, श्री.महारुद्र हनुमान नागरी सहकारी पतसंस्था सातपूर नाशिक व नाशिक जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने त्र्यंबकेश्वर येथे दोन दिवसीय सहकार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते सहकार मित्र पुरस्काराचे वितरण करण्यात आले. या प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी आ. हिरामण खोसकर, नाशिक जिल्हा नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे, महारुद्र पतसंस्थेचे संस्थापक सदाशिव माळी, परसरराम गिरी महाराज, नारायण वाजे, ड.अंजली पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष रंजन ठाकरे, कार्याध्यक्ष गोरख बोडके, गोविंद माळी, श्रीराम मंडळ यांच्यासह पदाधिकारी व सहकार क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, सन १९१२ साली सहकारी संस्थांचा कायदा सावकारीतून सामान्य जनतेची मुक्तता, सहकार चळवळीला प्रोत्साहन आणि त्या माध्यमातून आर्थिक प्रगतीला हातभार लागावा, या उद्देशाने राजर्षी शाहूंनी हिंदुस्थान सरकारचा १९१२ चा को-ऑपरेटिव्ह सोसायटी कायदा सर्व कलमांसह १ जून १९१३ रोजी करवीर संस्थानात लागू केला. महाराष्ट्रात छत्रपती शाहू महाराजांपासून सहकाराची सुरुवात झाली. ही सहकार चळवळ पुढे वैकुंठभाई मेहता, धनंजयराव गाडगीळ, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील ते आता शरदचंद्र पवार यांनी रुजविली असल्याचे त्यांनी सांगितले.

ते म्हणाले की, सहकारी चळवळीने देशातील कोट्यवधी लोकांना आपल्या पायावर उभं केलं. सहकारी चळवळीने महाराष्ट्रातील शेतकरी ताठ मानेने उभा राहिला. त्याचा अभ्यास देशातील इतर राज्यांनी केला आणि आपल्या राज्यातही ही चळवळ रुजविण्याचा प्रयत्न केला. सर्वांसाठी तळमळीने काम करणारे कार्यकर्ते जोपर्यंत सहकारात होते, तोपर्यंत सहकार चळवळीला देशभर भरभराट लाभली होती. मात्र सर्वांच्या हितापेक्षा स्वहित जपण्यास सहकारात सुरवात झाली त्यामुळे सहकारला गिळंकृत केले. आज सहकार क्षेत्रातील बहुतांश संस्था आजारी आहेत. काही संस्था बंद पडल्या तर अनेक बंद पडण्याच्या मार्गावर असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

ते म्हणाले की, नाशिक जिल्हा बँकेच्या प्रश्न तसेच राज्यातील पतसंस्थाच्या प्रश्नावर लवकर उपमुख्यमंत्री व सहकार मंत्री यांच्या समवेत बैठक घेऊन या संस्थांचे प्रश्न सोडविले जातील. शासन म्हणून या पुढील काळात सहकार क्षेत्रातील ज्या अडीअडचणी असतील त्या सोडविण्यासाठी आम्ही कटीबद्ध असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी ना. छगन भुजबळ यांच्या हस्ते सुरेश वाबळे, वासुदेव काळे, गोरख चव्हाण, निलिमा बावणे, संदीप माळी, शशिकांत साळुंखे यांचा सहकार मित्र पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

# दिल्लीला पाणी कसे पाजायचे हे शिवरायांनी दाखवून दिलेय : ठाकरे

**मुंबई । प्रतिनिधी**



दिल्लीला कसे पाणी पाजायचे हे छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्याला इतिहासातून दाखवून दिले आहे, त्यातून आजच्या काळात आपण प्रेरणा घेण्याची गरज आहे. तसेच महाराष्ट्राला इतिहास आहे असे वक्तव्य उद्धव ठाकरे यांनी मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये एका कार्यक्रमात केले. उद्धव ठाकरे पुढे बोलताना म्हणाले की, महाराष्ट्रात ज्याचा जन्म होतो, त्याच्या रक्तातच शिवप्रेम भिनलेले असते. राजवाडे इतिहास संशोधन संस्था एवढे वर्षे टिकवणे आणि समाजाला ज्याचा उपयोग होईल, अशी पुस्तके प्रकाशित करणे, यासाठी एक प्रकारचे धाडस लागते. ते धाडस यांनी दाखवले आहे. यावेळी उद्धव ठाकरे यांनी गड,किल्ले, दुर्ग याबाबतचा आपला अनुभवही सांगितला. दुर्गाबाबत आपला वेगळा अनुभव आहे. आकाशातून दुर्ग बघावा, असे आपल्या मनात आले. इतरांना भूगोल असले, मात्र महाराष्ट्राला इतिहास आहे. भूगोलाचा वापर इतिहासात कसा केला गेला, हे पाहण्याची आपल्याला उत्सुकता होती. दुर्गाच्या जागा कशा निवडल्या गेल्या. त्यांची जडण-घडण कशी झाली. त्याची बांधणी कशी झाली, याचे कुतुहल होते. राजगडाची तटबंदी कशी बांधली असेल, त्या काळात हे बांधकाम कसे झाले असेल, एवढे मोठे, अवजड दगड कसे आणले असतील, त्याला आकार कसा दिला असेल, असे प्रश्न उपस्थित होतात. हे काम करताना प्रचंड धोका होता. थोडेही दुर्लक्ष झाले, पाय घसरला तर दरीत पडण्याची भीती होती. असे थरारक क्षण आपल्या इतिहासात आहे. दुर्ग बोलायला लागले तर काय होईल. या दुर्गांना काहीतरी सांगायचे आहे, असे आपल्याला नेहमी वाटते. त्यातून इतिहासातील सुवर्ण पानांचा मागोवा घेता येईल, असेही उद्धव ठाकरे म्हणाले.

# ’वाचनाची वारी, आली आपुल्या दारी’ जयहिंदमधील विद्यार्थ्यांनी हाती घेतला उपक्रम

**धुळे । प्रतिनिधी**

येथील जयहिंद हायस्कूल, धुळे येथील इ.१०वी तुकडी फ च्या विद्यार्थ्यांनी स्वसंकल्पनेतून ’वाचनाची वारी, आली आपुल्या आपल्या दारी’ या घोषणेनुसार विद्यार्थ्यांच्या मनात वाचनाची गोडी निर्माण व्हावी, या हेतूने एक उपक्रम हाती घेतला आहे. सदर उपक्रमाचे उद्घाटन शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. संजीवनी एन. पाटील यांनी केले.

सदर प्रसंगी शाळेचे उपमुख्याध्यापक एस. व्ही.




बैसाणे, पर्यवेक्षक एस. डी. मोरे, व्ही. टी. गवळे, सौ. एम् . व्ही. पिंपळीसकर यांची प्रमुख उपस्थिती होती.वर्गातील सर्व होतकरू विद्यार्थी, विद्यार्थिनी यांनी सोबत एकत्र येऊन हा उपक्रम वर्षभरातून यशस्वी करण्याचा संकल्प केला आहे.

# ‘संदेश भूमी’त आज होणार संदेश मेळावा

### शाहीर संभाजी भगत यांच्या कार्यक्रमाचे आयोजन

**धुळे । प्रतिनिधी**

दि. ३१ जुलै १९३७ रोजी भारतीय घटनेचे शिल्पकार, बोधिसत्व, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या ट्रॅव्हलर्स बंगलो अर्थात संदेश भूमी धुळे येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना येण्यास यंदा ८६ वर्षे पूर्ण होत आहेत. म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतींना उजाळा देण्याकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर संदेश भूमी संरक्षण आणि संवर्धन कृती समिती धुळेच्या वतीने दि. ३१ जुलै २०२३ रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात प्रामुख्याने सकाळी ९ वाजता बुद्ध वंदना, पंचशील ध्वजारोहण, सकाळी १० वा.महार रेजिमेंट च्या माजी सैनिक व समता सैनिक दल, बहुजन व्हॉलेंटरी फोर्स कडून संदेश भूमीस मानवंदना, सायंकाळी ५ वा.डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी कलशाची मिरवणूक ढोल, ताशा, लाठी काठी, तलवार बाजी, दांडपट्टा, लेझीम यांच्या प्रात्यक्षिकांसह मिरवणूक, तसेच सायंकाळी ५:३० वा. संदेश भूमी येथे शाहीर संभाजी भगत यांचा प्रबोधनाचा



कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ड.विलास झाल्टे असतील. प्रमुख अतिथी म्हणून आ.फारूख शहा, महापौर प्रतिभाताई चौधरी, जेष्ठ दलित नेते एम.जी.धिवरे, वाल्मिक दामोदर यांना आमंत्रित करण्यात आले आहे. तसेच स्वागत अध्यक्ष इंजी. जी.के.गवळे, कार्यकारी अभियंता आर. आर.पाटील, उप अभियंता धर्मेंद्र झाल्टे, प्रा.बाबा हातेकर, दिलीप अप्पा साळवे, ड.मधुकर भिसे, आनंद जगदेव, मनोज मोरे, सतिष महाले आदी उपस्थित राहणार आहेत. उपस्थितीचे आवाहन संदेश भूमी संरक्षण आणि संवर्धन कृती समिती धुळे अध्यक्ष आनंद सैंदाणे, रवि शिंदे, दिपक नगराळे, विजय सुर्यवंशी, संजय अहिरे, शरद वेंदे, विजय भामरे, बाळासाहेब अहिरे, विजयराव मोरे, नाना शामकांत साळवे, अशिषकुमार गजभिये, भटू वाघ, सागर भामरे, धम्मपाल निकम, आनंदा सोनवणे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# भिडे अफजल खानाच्या वकिलाचे वंशज – ठाकूर

**मुंबई ।** संभाजी भिडे हा माणूस इतका घाणेरडा आहे. भिडे ज्या भागातून येतात तेथे फोन लावला आणि हा कसा माणूस आहे असं विचारलं. तेव्हा स्थानिक लोकांनी सांगितलं की, संभाजी भिडे अफजल खानाचे वकिल कृष्णाजी भास्कर कुलकर्णी यांचे वंशज आहेत. म्हणजे हे वंशज कोणाचे, नाव काय ठेवतात, बोलतात काय. दुसरीकडे सरकार त्यांना खुलेपणाने फिरू देत आहे. अशी टीका यशोमती ठाकूर यांनी केली आहे.

यशोमती ठाकूर म्हणाल्या की, पंडित नेहरूंचे देशासाठी नखाइतकेही योगदान नाही असं संभाजी भिडे म्हणतात, मग त्यांनी योगदान दिले आहे का? नेहरू देशासाठी ११ वर्षे तुरुंगात होते. ११ वर्षे तुरुंगात असलेल्या व्यक्तिला हे असे कसे बोलू शकतात. ते युवकांची डोकी खराब करत आहेत. युवकांची पिढी खराब करण्याचं षडयंत्र आहे. हे आम्ही होऊ देणार नाही. आम्ही संभाजी भिडेंवर गुन्हे दाखल करा म्हणून आग्रह धरला तर आमच्यावर गुन्हे दाखल झाले. संभाजी भिडेंवर सगळीकडे गुन्हे दाखल झाले पाहिजे आणि त्यांना अटक केली पाहिजे. त्यांच्यावर अदखलपात्र गुन्हा दाखल झाला पाहिजे. देशाच्या इतिहासाची मोडतोड करण्याचा अधिकार कोणालाही नाही. हे असंच करत राहिले आणि समाजात अशांतता पसरवली, १५ ऑगस्टच्या काळात काही अनर्थ झाला, तर याला जबाबदार गृहखातं, पोलिस आणि नालायक संभाजी भिडे असेल, असा इशारा यशोमती ठाकूर यांनी दिला.

# ट्रिपल महाराष्ट्र केसरी विजय चौधरीने विदेशात कोरले सुवर्णपदकावर नाव

**जळगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचा स्टार कुस्तीपटू तीन वेळा 'महाराष्ट्र केसरी' विजेता आणि अप्पर पोलिस अधीक्षक विजय नथ्थू चौधरीने भारतासाठी सोनेरी कामगिरी केली. कॅनडाच्या विनिपेग येथे झालेल्या जागतिक पोलिस अँड फायर गेम्समध्ये कुस्ती या खेळात कॅनडाच्या गतविजेत्या जेसी साहोताचा पराभव करीत त्याने भारताचे नाव उंचावत जगज्जेतेपद काबीज केले.




जागतिक पोलीस अँड फायर गेम्स हे जागतिक स्तरावर पोलीस दलासाठी ऑलिम्पिक मानले जाते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत चौधरीने उपांत्य फेरीत त्याचा सामना गतविजेता आणि संभाव्य विजेत्या जेसी साहोताशी झाला. त्याने अटीतटीच्या सामन्यात साहोताचा ११-०८ अशा फरकाने पराभव करीत अंतिम फेरी गाठली. या विजयानंतरच विजयचे जगज्जेतेपद निश्चित झाले होते. अंतिम सामन्यात त्याने अमेरिकेच्या जे. हेलिंगरवर १० गुणांची मोठी आघाडी घेत अंतिम सामना ११-०१ ने जिंकत भारताला सुवर्णपदक मिळवून दिले.

# वसुली करुनही पुन्हा पैसे मागितल्याने गुन्हा दाखल

**नाशिक ।** अडचणीपोटी नातलगांना तब्बल दहा टक्के व्याजाने आठ लाख रुपये देत १९ लाखांची वसुली केल्यानंतरही खोटा गुन्हा नोंदविण्याची धमकी दिल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. याप्रकरणी कांचन संदीप चावडा आणि संदीप जगदीश चावडा (रा. अनुसयानगर) या संशयित दाम्पत्यावर खंडणीसह खासगी सावकारी नियंत्रण कायद्यान्वये गुन्हा दाखल झाला आहे.

# आज लळींग लांडोर बंगला येथे भरणार ’भीमस्मृती यात्रा’



### सचिन माळी व शीतल माळी यांचा कार्यक्रम

**धुळे । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या किल्ले लळींग भागातील निसर्गरम्य ’लांडोर बंगला’ परिसरात आज ’भीमस्मृती यात्रा’ भरणार आहे. लांडोर बंगला येथे बाबासाहेबांच्या स्मृती जपत १९९२ साली प्राचार्य जे. जी. खैरनार यांनी या भीमस्मृती यात्रेला सुरुवात केली होती. आज या यात्रेला मोठा भीमसागर उसळणार आहे. यानिमित्त लांडोर बंगला परिसरात विविध पक्ष, संघटनांतर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात प्रामुख्याने नव्यानं महाजलसाचे शाहीर सचिन माली व शाहीर शीतल माळी यांचा कार्यक्रम होणार आहे. तसेच पुस्तके व विविध वस्तूंचे स्टलस देखील या यात्रेत लावले जातात. यात्रेला लाखोंचा भीमसागर उसळत असल्याने मोहाडी पोलीस ठाण्यातर्फे मोठा पोलीस बंदोबस्त तैनात असेल. पार्किंगचेही नियोजन करण्यात आले आहे. याशिवाय मुंबई-आग्रा महामार्गावरील वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात आला आहे. धुळे ते आर्वी पर्यंतची वाहतूक आज दिवसभरासाठी बंद ठेवून ती चाळीसगाव रोड चौफुली, शिरुड चौफुली, मोघण गाव, आर्वी पोलीस दूरक्षेत्र मार्गे वळविण्यात आली आहे. यात्रेदरम्यान येणाऱ्या आंबेडकरी अनुयायांसाठी मोहाडी पोलीस व वनखात्यासह पक्ष, संघटनांनी विविध सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

# विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण व सोयी सुविधा देण्यासाठी शासन कटीबद्ध

### शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी दिली ग्वाही

**नाशिक । प्रतिनिधी**



### विद्यार्थ्यांचे पाठीवरचे ओझे कमी करणार

**विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण आनंदाने घेता यावे यासाठी शिक्षण विभागामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. त्यात प्रामुख्याने दफ्तराचे ओझे कमी करण्यावर भर देण्यात येणार असून एकाच पुस्तकातून सगळे विषय शिकविण्याबाबतचा प्रयोग महाराष्ट्रात राबवायचा असून यामध्ये शिक्षण विभागाने लक्ष घालावे, अशा सूचनाही श्री केसरकर यांनी दिल्या.**

प्रत्येक शालेय विद्यार्थ्याला सर्व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे हे शासनाचे ध्येय असून विद्यार्थ्यांना दर्जे दार शिक्षण व सोयी सुविधांसाठी शासन कटीबद्ध आहे. येत्या काळात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक धोरण ठरविण्यात येणार असल्याची ग्वाही, राज्याचे शालेय शिक्षण मंत्री तथा क्रीडा विभाग मंत्री दिपक केसरकर यांनी दिली.

विभागीय शिक्षण मंडळ, नाशिक विभाग नाशिक येथे राज्याचे शिक्षण मंत्री तथा क्रीडा विभाग मंत्री दिपक केसरकर यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षण विभागाचे अधिकारी यांची आढावा बैठक घेण्यात आली, त्यावेळी श्री. केसरकर बोलत होते. यावेळी विभागीय मंडळ नाशिक विभाग नाशिकचे चेअरमन नितीन उपासनी, शिक्षण उपसंचालक डॉ. बी. बी. चव्हाण, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) प्रवीण पाटील, महानगरपालिकेचे प्रशासन अधिकारी बी. टी. पाटील व नाशिक विभागातील शिक्षण विभागाचे अधिकारी, शिक्षण संस्थांचे संचालक व प्रतिनिधी उपस्थित होते.

शालेय शिक्षणमंत्री श्री केसरकर पुढे म्हणाले की, मुलांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी त्यांना मोफत गणवेश, पुस्तके, वह्या व इतर सुविधा शासनामार्फत उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तसेच शैक्षणिक संस्थांच्या समस्या मार्गी लावण्यासाठी टप्पा अनुदान जाहिर करण्यात आले. परंतु या अनुदानातून फक्त २५ ते ३० टक्केच नवीन शाळांना मान्यता देण्यात आल्यामुळे यासाठी काही अटी, शर्ती शिथिल करुन जास्तीत जास्त शैक्षणिक संस्थाना न्याय देण्यासाठी शिक्षण विभागाचे प्रयत्न सुरु आहे. तसेच विशेष मोहिम राबवून जवळपास ६१ हजार शिक्षकांना न्याय देण्यात आला आहे.

शालेय प्रश्न सोडवत असतांना टप्पा अनुदानात शाळांना सहभागी करुन घेण्याबरोबर शिक्षकांची मोठी भरती सुरु करण्यात आली. यामध्ये पहिल्या टप्प्यात ३० हजार व दुसऱ्या टप्प्यात २० हजार शिक्षकांची भरती सुरु केली. ही भरती लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी जिल्हा परिषदांचे रोस्टर परिपूर्ण करावे. त्याचबरोबर शिक्षक भरतीच्या अनुषंगाने शाळांनी व संस्थानी शालेय रेकॉर्ड व रोस्टर अद्यावत ठेवावे, जेणेकरुन पुढील काळात भरती प्रक्रीया जलद गतीने राबविण्यात येईल. तसेच जोपर्यंत नवीन भरती होत नाही तोपर्यंत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये यासाठी सेवानिवृत्त शिक्षकांची सेवा घेवून विद्यार्थ्यांना शिकविण्यात येणार आहे, असेही श्री केसरकर यांनी सांगितले.

## ग्रामीण भागात रस्त्यांची तातडीची गरज

देशात स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे केले जात असताना आणि महाराष्ट्रात अनेक मोठे आणि महत्त्वाकांक्षी प्रकल्प मार्गी लावण्याचे प्रयत्न केले जात असताना ग्रामीण भागातील लोकांची दैना सुरूच असल्याची आपल्याला प्रचिती येते. अनेक गावांमध्ये आजही रस्ते नसल्यामुळे नागरिकांची किती गैरसोय होते, हेही लक्षात येते. नाशिक जिल्ह्याच्या इगतपुरी तालुक्यातील आदिवासी गावातील एका गरोदर महिलेला गावात रस्ता नसल्यामुळे दवाखान्यात जाईपर्यंत आपले प्राण गमवावे लागल्याची हृदयद्रावक आणि मन हेलावून टाकणारी घटना नुकतीच घडली आहे. या घटनेमुळे संपूर्ण इगतपुरी तालुक्यात खळबळ उडाली असून हळहळ व्यक्त केली जात आहे.

रस्त्यांमुळे विकास होतो, दळणवळणाच्या सुविधांमुळे लोकांचे जीवन सुकर होते. देशभरात आणि राज्यांत मोठ्या प्रमाणावर अनेक रस्त्यांची आणि समृद्धी महामार्गासारख्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांची कामे केली जात असताना ग्रामीण भागात आजही रस्ते नाहीत, याला काय म्हणावे? दिवसेंदिवस शहरे समृद्ध होत चालली आहेत. शहरांत शासन आणि महापालिकांच्या माध्यमातून रस्त्यांची कामे केली जातात. शिवाय स्मार्ट सिटीमध्ये काही शहरांचा समावेश झाल्यामुळे शहरांना अधिकचा निधी मिळाल्यामुळे शहरांच्या विकासात भर पडली आहे; परंतु ग्रामीण भागातील रस्ते वर्षानुवर्षे विकासापासून कोसो दूर आहेत. अनेक गावांमध्ये तर रस्तेच नाहीत. त्याकडे ना स्थानिक जिल्हा परिषद, ना पंचायत समितीचे लक्ष आहे, ना शासनाचे अशी आज परिस्थिती आहे. महात्मा गांधीजी म्हणत असत, 'खेड्याकडे चला, खरा भारत खेड्यात आहे. आधी खेडी समृद्ध झाली पाहिजेत.' पण आज चित्र उलटे आहे. शहरे चकाचक होत आहेत, तर गावे भकास होत चालली आहेत. हे कुणी थांबवायचं? असाही प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही.

आपल्या देशात १९५२ पासून सार्वत्रिक निवडणुका होत आहेत. मग त्या लोकसभेच्या असो, नाहीतर विधानसभेच्या. आपल्या मतदारसंघाचा विकास व्हावा, यासाठी लोकसभेवर खासदार निवडून पाठवला जातो, तर विधानसभेवर आमदार निवडून पाठवला जातो. १९५२ ते आजपर्यंत कितीतरी निवडणुका झाल्या. किती खासदार आणि किती आमदार निवडून आले. या लोकप्रतिनिधींनी आपल्या मतदारसंघाचा विकास करावा. मग त्यात रस्ते, दिवाबत्ती, पूल, सामाजिक सभागृहे या व अशासारखी कामे त्यांनी करून लोकांना सुविधा निर्माण करून दिल्या पाहिजेत. या विविध विकासकामांसाठी केंद्र सरकार खासदारांना, तर राज्यांमध्ये सत्तेवरील सरकारकडून आमदारांना निधी दिला जातो. या निधीतून अनेक कल्याणकारी कार्यक्रम पार पडले पाहिजेत म्हणजे शहर किंवा गावे विकसित होतील, अशी त्यामागील संकल्पना आहे; परंतु या संकल्पनेला हरताळ फासला जात असून गावांचा विकास तर सोडाच, पण लोकप्रतिनिधींचा विकास होत आहे, असे खेदाने म्हणावे लागते. आपल्या मतदारसंघातील लोकांच्या काय समस्या आहेत, ते कसे जीवन जगतात, याकडे कुणाचेही लक्ष नाही. मग हा निधी जातो कुठे? असाही प्रश्न आहे. हे सर्व सांगण्याचे कारण असे की, केवळ विकासाच्या वल्गना केल्या जात आहेत. गावांना जोडण्यासाठी अनेक ठिकाणी रस्तेच नाहीत, हे वास्तव चित्र आहे. अशाही परिस्थितीत लोक जगत आहेत.

इगतपुरीसारख्या आदिवासी अतिदुर्गम तालुक्यात शासन यंत्रणेच्या कारभाराचा फटका आदिवासी नागरिकांना बसत आहे. गतिमान सरकारच्या ढिसाळ कारभारामुळे इगतपुरी तालुक्यातील तळोघ जुनवणेवाडी येथील गरोदर महिलेला आपला नाहक प्राण गमवावा लागला आहे. या गावाला रस्ता नसल्याने संबंधित गरोदर महिलेला डोलीतून नातेवाइकांनी पहाटे अडीच वाजता अडीच किलोमीटर पायपीट करून दवाखान्यापर्यंत पोहोचवले. मात्र पायपीट, प्रसूती वेदना आणि पाऊस यामुळे झालेल्या विलंबामुळे या महिलेने दवाखान्यात प्राण सोडला. तिचा मृतदेह घरी नेण्यासाठी चक्क झोळी करून तो न्यावा लागला. करोडो रुपयांची स्वप्ने दाखविणाऱ्या शासनासाठी अत्यंत खेद वाटणारी ही घटना असून या गावाला तातडीने रस्ता करावा, अशी मागणी आता गावकऱ्यांकडून केली जात आहे. तळोध ग्रामपंचायत हद्दीत जुनवणेवाडी ही आदिवासी वस्ती आहे. मुख्य रस्त्यापर्यंत येण्यासाठी गावकऱ्यांना अडीच किलोमीटर अतिशय कच्च्या मार्गाने यावे लागते. हा कच्चा रस्ता पावसामुळे चिखलमय झाला. जुनवणेवाडी येथील वनिता भगत या गरोदर आदिवासी महिलेला प्रसूती वेदना सुरू झाल्याने पहाटे अडीच वाजता दवाखान्यात जाण्यासाठी नातेवाईक व तिने पायपीट केली. जास्तच त्रास होऊ लागल्याने तिला डोली करून त्यामध्ये झोपवण्यात आले. अखेर दवाखान्यात पोहोचल्यानंतर तिचा मृत्यू झाला. मृतदेह अंतिम संस्कारासाठी घरी नेण्यासाठी रस्त्याची समस्या असल्यामुळे डोली करूनच तो न्यावा लागला.

# गावांचे भौगोलिक सर्व्हे करा

कोकण विभागातील रायगड जिल्ह्यामध्ये १९ जुलै, २०२३ रोजी इर्शाळगडाची (तालुका खालापूर) डोंगरकडा कोसळल्याने आतापर्यंत २७ नागरिकांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले असून ५७ लोक बेपत्ता असल्याचे घोषित केले आहे. आता सात दिवसानंतर बेपत्ता लोकसुद्धा मृत म्हणून घोषित केले जातील. म्हणजे एकूण ८४ लोक मृत पावल्याचे शासन दरबारी नोंद होईल. त्याआधी २२ जुलै, २०२१ रोजी तळीयेवाडी (तालुका महाड) दरड कोसळून त्यात ८४ लोकांना आपल्या जीवाला मुकावे लागले होते. आता दरडीचे गांभीर्य लक्षात घेऊन रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी योगेश म्हसे यांनी २१ जुलै, २०२३ रोजी रायगड जिल्ह्यातील सर्व अधिकाऱ्यांची बैठक घेऊन जिल्ह्यातील दरडप्रवण क्षेत्रांचा आढावा घेऊन १०३ गावे धोकादायक असल्याचे जाहीर केले आहे. यात ९ गावे अतिधोकादायक, ११ गावे धोकादायक आणि ८३ गावे अल्पधोकादायक असे वर्गीकरण करण्यात आले आहे. आता जरी जिल्हाधिकाऱ्यांनी धोकादायक गावांची नावे घोषित केली असली तरी त्याआधी ज्या गावांची नावे दरडग्रस्त म्हणून घोषित केली होती, त्यामध्ये इर्शाळवाडीचा समावेश नव्हता.

तेव्हा आता पुन्हा ८४ काय एकाही व्यक्तीचा दरडीमुळे मृत्यू होणार नाही, यासाठी आतापासून प्रशासनाला आपले ठोस पाऊल उचलावे लागेल. आजही इर्शाळवाडीत जाण्यासाठी सुमारे दीड तास चालत जावे लागते. म्हणजे आपण किती प्रगती केली, हे सहज लक्षात येते. आता असे प्रकार पुन्हा घडू नये म्हणून प्रयत्न केले जातील. मात्र असे प्रकार घडतातच कसे? हा महत्त्वाचा मुद्दा आहे. अशा वेळी पर्यावरण तज्ज्ञांनी पुढे यायला हवे. त्यासाठी आपल्याजवळ प्रत्येक जिल्ह्याची भौगोलिक माहिती असणे आवश्यक आहे. आपल्या भारत देशाने सन १९८०



पासून भौगोलिक माहिती प्रणालीचा वापर केला. यामध्ये कृषिक्षेत्र, आपत्ती-व्यवस्थापन, ई-प्रशासन, हवामान, वने, ग्रामीण विकास, समाजोपयोगी जलस्रोत इत्यादींसंबंधी माहिती संकलित करण्यात आली. असे जर रायगड जिल्ह्यात झाले असते, तर आज वेगळी परिस्थिती दिसली असती. त्याप्रमाणे शासन सतर्क राहिले असते. त्यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नसती.

असे धोके भविष्यात होऊ नये म्हणून प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांनी भौगोलिक माहिती प्रणालीचा वापर करावा. यासाठी पर्यावरण आणि भूगोल विषयाचे अभ्यासक, आपल्या विविध विभागांचे प्रमुख, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि गावातील सामाजिक कार्यकर्ता (तो कोणत्याही राजकीय पक्षाचा नसावा) यांची आपल्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करावी. त्यानंतर प्रत्येक तालुक्यातील तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती स्थापन करून प्रत्येक गावांचा आढावा घ्यावा. यामध्ये गावात अतिधोकादायक, धोकादायक आणि अल्पधोकादायक गावांचे वर्गीकरण करून तिची माहिती एकत्र करून तिचे सादरीकरण करण्यात यावे किंवा तशी माहिती गोळा करून जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात यावी. मिळालेली माहिती जिल्ह्यातील रहिवाशांच्या माहितीसाठी स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिद्ध करण्यात यावी. तसेच याविषयी लोकांमध्ये जागृती करून त्यांना माहिती पाहण्यासाठी खुली करावी. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी माहिती केंद्राची स्थापना करावी. म्हणजे समितीकडे आलेल्या तक्रारींची योग्य दखल घेऊन त्याप्रमाणे नागरिकांच्या हिताचे निर्णय घेता येतील.

आपल्या देशातील नागरिकांमध्ये अनेक प्रकारची आव्हाने आहेत. त्यांना योग्य प्रकारे सामोरे जाण्यासाठी भौगोलिक माहिती प्रणालीचा वापर केला गेला पाहिजे. यामुळे कुठे धोके आहेत, याची समाजाला कल्पना येऊन समाजाचा विकास साधण्याला मदत होते. त्यामुळे आपल्या देशामध्ये भौगोलिक माहिती प्रणालीची काटेकोरपणे अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. यासाठी राजकीय इच्छाशक्तीची खरी गरज आहे. कारण या प्रणालीचा योग्यप्रकारे वापर केला, तर कोणत्याही प्रकारची मनुष्य हानी होणार नाही. लोक गुण्यागोविंदाने नांदतील. इतकी क्षमता या प्रणालीमध्ये आहे. सध्या धुवांधार पाऊस पडत आहे. त्यात इर्शाळवाडीचे उदाहरण ताजे आहे, तेव्हा आपली वाडी डोंगराच्या पायथ्याशी असेल आणि डोंगराला तडे किंवा डोंगरावर पडलेले पावसाचे पाणी डोंगरात मुरत असेल, तर नक्कीच आज नाहीतर उद्या इर्शाळवाडी होईल. तेव्हा असा कोणताही अनुचित प्रकार होऊ नये म्हणून आपल्या गावाची ग्रामसभा घेऊन त्यातील माहीतगार लोकांनी संबधित जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे. म्हणजे पुढील कारवाई करणे सोपे जाईल. यापुढे आपण गाफील राहून चालणार नाही. जर शासन पुढाकार घेत नसेल, तर त्यांच्या निदर्शनात बाबी आणून दिल्या पाहिजेत. त्यानंतर आतापर्यंत त्या गावावर शासकीय निधी खर्च करण्यात आला असेल, तर असे प्रकार घडतातच कसे ? याचापण विचार होणे आवश्यक आहे. जर आपल्या गावावर नैसर्गिक संकट असेल, तर त्यागावच्या संबंधित सरपंच व शासनाचा प्रतिनिधी म्हणून ग्रामसेवक यांनी लेखी स्वरूपात कळविले पाहिजे. आता केवळ रायगड जिल्ह्यात झाले. तेव्हा रायगड जिल्ह्यातील घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन आपल्या राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामधील गावांचा भौगोलिक सर्व्हे करणे ही एक काळाची गरज झाली आहे.

**- रवींद्र तांबे**

**या विश्वात आईच्या प्रेमाशिवाय सर्वांवर निस्वार्थ प्रेम संत-महापुरुषांचे असते, कारण की ते आपल्या शिष्यांकडून स्वतःसाठी कसलीही अपेक्षा करीत नाहीत. त्यांच्याकडे जे कोणी येतात त्या सर्वांवर ते प्रेम आणि दयेचा वर्षाव करतात. ते नेहमी आपल्या शिष्यांना देतात, देतात आणि देत राहतात. आईच्या प्रेमाच्या उदाहरणावरून आपण त्यांचे निस्वार्थ प्रेम समजण्याचा प्रयत्न करू शकतो.**

# सर्वात सुरक्षित स्थान - संत राजिन्दर सिंह जी महाराज

आई स्वतःच्या आवश्यकतेविषयी कसलाही विचार न करता आपल्या मुलांना सर्व काही देऊन टाकते. ती त्यांच्यासाठी सर्व कष्ट घेते. बाळाला आपल्या गर्भात नऊ महिन्यापर्यंत ठेवण्याचा त्रास सहन करते, जन्मसमयी प्रसूतीच्या वेदना सहन करते, रडणाऱ्या शिशु करता रात्रंदिवस जागे राहाते आणि त्याला न्हाऊ घालते, त्याला खायला, प्यायला देते आणि जेव्हा तिचा शिशु आपल्या छोट्या डगमगणाऱ्या पावलांनी चालायला शिकतो, तसेच शिशु स्वतंत्रपणे सर्वत्र फिरायचा प्रयत्न करतो, तेव्हा ती त्याच्या पाठीशी उभे राहून त्याची काळजी घेते.

त्याच्या बालपणात आणि किशोरावस्थेत सुद्धा आई मुलाच्या प्रत्येक अवस्थेकडे लक्ष देण्यास सदैव तयार असते. इथपर्यंत की मुलगा मोठा होईपर्यंत, त्याचा विवाह करून संसाराला लावण्यापर्यंत, त्याचा परिवार होईपर्यंत आणि आपल्या वयाच्या वार्धक्या पर्यंत, आई केवळ आईच राहते, त्यावेळी सुद्धा ती आपल्या मुलांप्रती ती प्रेम आणि चिंता फक्त करते, एवढी की जेव्हा तो लहान होता. याकरिता आपणा सर्वांना आपल्या आई विषयी ऋणी राहिले पाहिजे.



ज्याप्रमाणे एखादी आई आपल्या मुलांकरता त्याग करते, त्याच्याही पेक्षा लाखो करोडो पटीत जास्तीत जास्त प्रेम आणि त्याग एक सद्गुरु आपल्या शिष्याकरिंता करतात. आपल्या अंतरी प्रभुची ज्योती प्रकाशमान आहे आणि दिवस रात्र २४ तास चमकत असते, तरीसुद्धा आपण तिला पाहू शकत नाही, असे का? कारण की या चर्मचक्षुंनी ती दिसत नाही. परमपिता परमेश्वराने आपल्या सर्वांना दोन भ्रुकुटीच्या मधोमध शिवनेत्र दिलेला आहे. ज्याच्याद्वारे आपण प्रभुच्या ज्योति चे दर्शन करू शकतो. परंतु यावेळी आपला शिवनेत्र बंद आहे. केवळ पूर्ण संत सद्गुरूच आपल्या शिवनेत्राला उघडू शकतात.

जेव्हा कधी आपण कोणी संत-सद्गुरूंच्या चरण कमली पोहोचतो, तेव्हा आपल्या अंतरातील डोळा, तो डोळा ज्याला दिव्य चक्षु अथवा तृतीय नेत्र म्हणतात, त्याला उघडतात. जेणेकरून आपण आपल्या अंतरातील प्रभूच्या ज्योतिला प्रकाश पाहू शकू. ते आपल्याला अंतर्मुख होण्याकरिता ध्यान-अभ्यास करण्याची विधी शिकवितात. सद्गुरूंच्या अध्यात्मिक तेजाने आणि कृपादृष्टीने आपण प्रभुच्या ज्योतिशी जोडले जातो, ज्यामुळे आपल्या जीवनात प्रसन्नता येते.

जर आपण आपल्या अंतरातील प्रसन्नतेच्या स्रोताशी जोडले गेलो नाही तर आपल्याकडे भले या दुनियेची सर्व संतुष्टी असेल परंतु, आपण नेहमी आपल्या अंतरी अशांत, दुःखी आणि भयग्रस्त राहतो. कारण की आपण सर्व जाणतो की आपल्या सुरक्षेला धोका आहे. आपल्याला असे वाटते की धोका सर्व ठिकाणी गुप्त रूपात लपलेला असतो. आपण एक असे सुरक्षित स्थान इच्छितो की जिथे आपण या भयापासून मुक्त असू. जसे की बाळाच्या रूपात प्रथम स्थान त्याच्या माता-पित्यांची कुस आहे, तिथे त्याला सुरक्षित वाटते. या मुळे त्याला काही फरक पडत नाही तो येणाऱ्या कोणत्या संकटांचा सामना करू शकतो. तो आपल्या माता-पित्यांच्या जवळ शांति अनुभवतो.


ठीक अशाच प्रकारे आपण पाहतो की, लहान मुलांचे डॉक्टर बाळाला इंजेक्शन देतेवेळी बाळ अति तीव्र वेदनेने विव्हळते. परंतु जेव्हा आई-वडील मुलाला जवळ उचलून घेतात तेव्हा मूल शांत होते. जेव्हा बालक पडतो त्याच्या तोंडून पहिला शब्द जो बाहेर पडतो तो म्हणजे 'आई'. तोच मुलगा मोठा झाल्यावर नेहमी आपल्या आई-वडिलांचा सहवास इच्छितो.

आपण आपल्या जीवनात अनुभवतो की, आपले माता पिता सुद्धा नश्वर आहेत .जसजसे त्यांचे वय वाढते तेव्हा आपण आपल्या आई-वडिलांना स्वास्थ्य संबंधी समस्यांनी घेरलेले पाहतो अथवा आपल्यापैंकी काही जण असेही अनुभवतात की, काळानुसार प्रभूच्या निजधामी जातात तेव्हा आपल्याला कळते की ज्याच्यावर आपण स्वतः सुरक्षित राहण्यासाठी भरवसा करीत होतो, ते सुद्धा संकटात असतात आणि आपल्यासारखे ते सुद्धा प्राणी मात्र आहेत. आपण जाणतो की, आपले आई-वडील सुद्धा कायमस्वरूपी राहणारे नाहीत आणि त्यांना सुद्धा अशाच प्रकारे जीवनातील सत्याशी सामना करावा लागतो, जसे आपण करीत आहोत मग तेव्हा आपले लक्ष कुठे जाते?

तेव्हा आपण अशी जागा शोधतो जिथे आपण नेहमीच आरामदायी आणि सुरक्षित राहू. अशावेळी आपले लक्ष प्रभू कडे जाते. कारण की या दुनियेमध्ये खरे सर्वात सुरक्षित स्थान केवळ प्रभूच आहेत. या संसारात जीवन जगत असताना आपण प्रभू कडे कसे जाऊ शकतो? आजपर्यंत आपल्या सर्व संत-महापुरुषांनी आपल्याला साधा आणि सोपा मार्ग दाखविला आहे. आपण त्यांच्या अभंग, रचना व वाणी जेव्हा वाचतो तेव्हा आपण या निष्कर्षावर पोहोचतो की, ध्यान-अभ्यास करून प्रभुशी एकरूपता प्राप्त केली जाऊ शकते आणि सर्व मानवतेला हा सुंदर संदेश दिला की, पिता परमेश्वराशी केवळ एकरूप होण्याचा ध्यान-अभ्यासच असा एक मार्ग आहे. जर आपल्याला त्यांच्या संपर्कात यायचे असेल तर आपणास थोडा प्रयत्न करावाच लागेल. जेव्हा आपण प्रभू कडे एक पाऊल चालतो, तेव्हा तो १०० पावले आपल्याकडे येण्यासाठी उचलतो.

ध्यानाभ्यासाची ही विधी आपण विद्यमान संत सद्गुरूंकडून शिकू शकतो. त्यांच्याकडूनच आपल्याला समजेल की, आपल्या जीवनाचे ध्येय शरीर आणि मनाच्या बरोबर आत्म्याचा विकास करून प्रभूशी एकरूप व्हावयाचे आहे. ज्यामुळे आपल्या जीवनात कोणतीही समस्या येवो आपण त्यावर विजय प्राप्त करावा आणि आपल्या जीवनाच्या ध्येयपूर्तीसाठी प्रयत्नशील रहावे. जर आपण प्रेमभक्ती व दृढनिश्चयाने तीव्र इच्छेने प्रयत्नशील राहू तेव्हाच आपण आपल्या अध्यात्मिक ध्येयाची प्राप्ती करू शकतो, जे 'स्वतःला ओळखणे व प्रभू परमात्म्याला प्राप्त करणे आहे' आणि तिथेच आपण प्रभूच्या कुशीत जाऊन आपण आपल्याला सर्वात सुरक्षित असे स्थान प्राप्त करू शकू.

## शब्दकोडे-१३५



आडवे शब्द - १. भारताचे पंतप्रधानपद भुषविणारे पिता-पुत्री १०. पाण्यावरची लहर ११. सामान १२. प्रजा १४. व्यापारी (वृत्ती) १६. स्वभावातील मऊपणा १८. बरोबर आलेला फौजफाटा २१. जवळ (हिंदी) २३. समानता २४. प्रयत्न २६. वाळवंट २७. विलासी स्त्री २८. गाय २९. नवरदेव ३०. थोर, मोठा ३१. बोकड ३२. जगण्याचा वा इतिहासाचा टप्पा ३३. घट्टच्या विरुद्ध ३४. पोथी, पुस्तक गुंडाळण्याचे वस्त्र ३५. पानांची हालचाल, 'हिरव्या पानात, हिरव्या रानात --- -- चालती' (जैत रे जैत) ३८. वायू, हवा ३९. वेदना, खटका ४०. मनाला लागलेली बोच ४२. कपडे पांढरेशुभ्र करणारा रंग! ४३. निकट, काही अंतरावरच ४५. विहिरीतून पाणी काढण्याचे जोडसाधन ४८. भडीमार, मारा ४९. मुस्लिमांचा उपवासाचा महिना ५०. स्त्री भूत ५२. एकरूपता ५५. आरडाओरड, बोंबाबोंब ५८. अखंड ६०. बैलाच्या शिंगांना बांधण्याचा दोर ६२. तांदळाची मोठ्या दाण्याची जात ६४. हिंमत, छाती ६६. आग्रा येथील ऐतिहासिक वास्तू ६८. अंदाज, तर्क ७०. नासाडी, धूळधाण ७१. गुरांचा समुदाय ७२. भात शिजतानाचा आवाज ७४. अंकुर ७६. संपणे ७७. तारांबळ ७८. दार बंद करण्याची सोय

उभे शब्द - १. नावेचे पाण्यात पदार्पण २. हिस्सा ३. लक्ष्मी ४. संगोपन ५. सतत, रोज ६. खिशातील वस्त्र ७. राजाची आई ८. धैर्य ९. शेवट १३. एकूण एक, सर्व १५. अबोल्याची खूण १७. जीभ १९. गाईचे पिल्लू २०. बस्तान २२. दाह, आग २५. साधा, छक्केपंजे नसलेला २७. बारीक सारीक ३०. रग्गड ३१. सोपे नसलेले ३२. घटिकेचा हिस्सा ३३. सरसरीत ३४. मूल, बालक ३६. खार ३७. सततची हालचाल ३८. संधी, मोका ३९. पळसाचा डिंक ४१. केसांची बट ४३. एक गळीत धान्य ४४. लोकमाता ४५. अतिशयोक्ती करणे याअर्थी वाक्प्रचार ४६. गाणे म्हणणारी ४७. घर ५१. डबके, डमरू ५३. मनात साचून राहिलेली घाण ५४. ए.के. हंगल यांचे 'शोले'तील प्रसिद्ध वाक्य 'इतना --- क्यों है भाई' ५५. त्वरेने, हस्तेपरहस्ते ५६. समीक्षा ५७. तुळतुळीत गोटा ५९. वेल ६१. कृश व उंच शारीरिक ठेवण ६३. अर्धांगवायू ६५. उपकार ६७. हावरटपणा ६९. दूध वा दुधाचे पदार्थ ७१. रोटी आणि मकान बरोबर हा देखील हवाच ७३. चेष्टा ७५. अमेरिकेला नुकतेच त्रस्त करून गेलेले वादळ

## शब्दकोडे १३४ चे उत्तर

१.कावकाव ५.बात ७.बेरीज ९.अवतार ११.कळवळणे १२.माकड १४.रण १६.टरफल १७.गहन १९.अंदाजपत्रक २०.गोकुळ २२.यदा २४.अंतर २५.खटारा २६.कानन २७.उदर २८.कचोरी ३०.खोट ३१.परिवार ३२.रपाटा ३३.पतन ३५.परत ३७.आड ३८.रपेट ४०.पाव ४२.होरा ४४.पडाव ४६.जादा ४७.टसर ४९.मनुका ५१.कमरकस ५२.गन ५२अ.पदक ५४.कसकस ५७.सहसा ५८.कडक लक्ष्मी ६१.कर ६२.नरमाई ६५.कांचन ६६.सागरतट ६८.शर ७०.बाबत ७२.वसा ७५.जाळ ७६.सांज ७८.तडकाफडकी ७९.करारी ८०.कंबर

उभे उत्तर

१.काकपद २.वळण ३.काव ४.वळणदार ६.तमा ७.बेडर ८.जमालगोटा ९.अजागळ १०.रवी १३.कटकट १५.कापडचोपड १८.नयनरम्य १९.अंतरपाट २१.कुरापत २३.दान २४.अंदर २५.खटपट २६.कावा २९.रीत ३४.नर ३६.कोमट ३७.आराम ३९.पेचकस ४०.पावस ४१.आदानप्रदान ४३.भकास ४४.परवड ४५.डाक ४६.जाग ४८.सपक ४८अ. रद ५०.नुकसान ५३.कसरत ५५.कलमा ५६.लक्ष्मीकांत ५९.कर्जबाजारी ६०.रसातल ६१.करतूत ६३.रव ६४.ईश ६७.टवका ६९.रजक ७१.बळ ७३.साफ ७४.वाकी ७६.सांब ७७.जर

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# मध्य नाशिकमध्ये शासन आपल्या दारी अभियानात ५००० लाभार्थ्यांचा सहभाग

## आ. प्रा. देवयानी फरांदे यांनी केले उपक्रमाचे आयोजन





**नाशिक । प्रतिनिधी**

मध्य नाशिक मतदार संघाच्या आमदार प्रा. देवयानी फरांदे यांनी शालिमार परिसरातील नेहरू गार्डन समोर राबवलेल्या शासन आपल्या दारी अभियानास नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यात विविध लाभार्थ्यांना एकाच छताखाली शासकीय योजनांचा लाभ देण्यात आला. या अभियानात सुमारे ५००० लाभार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

अभियानाच्या उद्घाटन प्रसंगी पोलीस आयुक्त अंकुश शिंदे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात, तहसीलदार बहिरम यांच्यासह भाजपचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि शहरातील मान्यवर उपस्थित होते.



शासकीय निर्धारित शुल्कात २०० हून अधिक योजनांचा लाभ कमीत-कमी कागदपत्रांत या अभियानात देण्यात आला. यावेळी बोलताना आ. फरांदे यांनी सांगितले की, बर्याचदा सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांना सरकारी कार्यालयांचे उंबरे झिजवावे लागतात. तसेच वेगवेगळी कार्यालये वेगवेगळ्या ठिकाणी असल्याने लाभार्थ्याचा वेळ, पैसा आणि श्रम मोठ्या प्रमाणात खर्च होतो. याच पार्श्वभूमीवर केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ राज्यातील सर्वसामान्य जनतेपर्यंत एकाच छताखाली पोहचवण्यासाठी शासन आपल्या दारी अभियान सुरू करण्यात आले आहे. या अभियानाच्या माध्यमातून समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत शासनाच्या योजना पोहोचवण्यात येत आहेत. सरकारी योजनांचा लाभ घेताना येणार्या अडचणी कमी करण्यासाठी हे अभियान राबवण्यात येत आहे. लाभार्थ्यांच्या प्रस्तावांना जलद मंजुरी दिली जाणार आहे, असेही आ. फरांदे म्हणाल्या.

शासन आपल्या दारी हा आदर्श उपक्रम असून आ. फरांदे यांनी यात घेतलेला पुढाकार हा सर्वसामान्यांसाठी निश्चितच कामी येणारा असल्याचे पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांनी यावेळी सांगितले. अनिल भालेराव यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी तहसिलदार नरेशकुमार बहिरम, समाजकल्याण विभागाचे उपायुक्त प्रशांत पाटील, अतिरिक्त आयुक्त चौधरी, संजय गांधी निराधार योजनेचे तहसिलदार योगेश शिंदे, धान्य वितरण अधिकारी गणेश जाधव, माजी नगरसेवक यशवंत निकूळे, स्वाती भामरे, दीपाली कुलकर्णी, सुनील खोडे, संध्या कुलकर्णी, गणेश मोरे, शिवा जाधव आदी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण व सोयी सुविधा देण्यासाठी शासन कटीबद्ध :- शिक्षणमंत्री केसरकर



**नाशिक । प्रतिनिधी**

प्रत्येक शालेय विद्यार्थ्याला सर्व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे हे शासनाचे ध्येय असून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण व सोयी सुविधांसाठी शासन कटीबद्ध आहे. येत्या काळात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक धोरण ठरविण्यात येणार असल्याची ग्वाही, राज्याचे शालेय शिक्षण मंत्री तथा क्रीडा विभाग मंत्री दिपक केसरकर यांनी दिली.

विभागीय शिक्षण मंडळ, नाशिक विभाग नाशिक येथे राज्याचे शिक्षण मंत्री तथा क्रीडा विभाग मंत्री दिपक केसरकर यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षण विभागाचे अधिकारी यांची आढावा बैठक घेण्यात आली, त्यावेळी श्री. केसरकर बोलत होते. यावेळी विभागीय मंडळ नाशिक विभाग नाशिकचे चेअरमन नितीन उपासनी, शिक्षण उपसंचालक डॉ. बी. बी. चव्हाण, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) प्रवीण पाटील, महानगरपालिकेचे प्रशासन अधिकारी बी. टी. पाटील व नाशिक विभागातील शिक्षण विभागाचे अधिकारी, शिक्षण संस्थांचे संचालक व प्रतिनिधी उपस्थित होते.

### विद्यार्थ्यांचे पाठीवरचे ओझे कमी करणार

**विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण आनंदाने घेता यावे यासाठी शिक्षण विभागामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. त्यात प्रामुख्याने दफ्तराचे ओझे कमी करण्यावर भर देण्यात येणार असून एकाच पुस्तकातून सगळे विषय शिकविण्याबाबतचा प्रयोग महाराष्ट्रात राबवायचा असून यामध्ये शिक्षण विभागाने लक्ष घालावे, अशा सूचनाही श्री केसरकर यांनी दिल्या.**

शालेय शिक्षणमंत्री श्री केसरकर पुढे म्हणाले की, मुलांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी त्यांना मोफत गणवेश, पुस्तके, वह्या व इतर सुविधा शासनामार्फत उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तसेच शैक्षणिक संस्थांच्या समस्या मार्गी लावण्यासाठी टप्पा अनुदान जाहिर करण्यात आले. परंतु या अनुदानातून फक्त २५ ते ३० टक्केच नवीन शाळांना मान्यता देण्यात आल्यामुळे यासाठी काही अटी, शर्ती शिथिल करुन जास्तीत जास्त शैक्षणिक संस्थाना न्याय देण्यासाठी शिक्षण विभागाचे प्रयत्न सुरु आहे. तसेच विशेष मोहिम राबवून जवळपास ६१ हजार शिक्षकांना न्याय देण्यात आला आहे.

शिक्षक भरतीसाठी रोस्टर अद्ययावत ठेवावे

शालेय प्रश्न सोडवत असतांना टप्पा अनुदानात शाळांना सहभागी करुन घेण्याबरोबर शिक्षकांची मोठी भरती सुरु करण्यात आली. यामध्ये पहिल्या टप्प्यात ३० हजार व दुसऱ्या टप्प्यात २० हजार शिक्षकांची भरती सुरु केली. ही भरती लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी जिल्हा परिषदांचे रोस्टर परिपूर्ण करावे. त्याचबरोबर शिक्षक भरतीच्या अनुषंगाने शाळांनी व संस्थानी शालेय रेकॉर्ड व रोस्टर अद्यावत ठेवावे, जेणेकरुन पुढील काळात भरती प्रक्रीया जलद गतीने राबविण्यात येईल. तसेच जोपर्यंत नवीन भरती होत नाही तोपर्यंत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये यासाठी सेवानिवृत्त शिक्षकांची सेवा घेवून विद्यार्थ्यांना शिकविण्यात येणार आहे, असेही श्री केसरकर यांनी सांगितले.

यावेळी श्री केसरकर यांनी बैठकीस उपस्थित विविध शैक्षणिक संस्थांच्या प्रतिनिधींच्या समस्या, अडचणी जाणून घेऊन त्यावर योग्य त्या उपाययोजना करण्यात येईल असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरात कमला एकादशी अभिषेक

**लासलगाव । वार्ताहर**

येथील संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरात अधिकमास निमित्ताने कमला एकादशी अभिषेक करण्यात आला.

संत ज्ञानेश्वर माऊली मंदिरात नेहमीच धार्मिक व सामाजिक कार्य राबविण्यात येते.लहान मुलांवर संस्कार घडवण्यासाठी दर शनिवारी निलेश जगताप यांच्या सहकार्याने हनुमान चालीसा पठण होते तसेच भावी पिढी संस्कारक्षम होण्यासाठी सातत्याने समाज प्रबोधन कार्यक्रम घेण्यात येतात.



या वेळी ब्राह्मण महासंघ मैत्रेयी महिला मंडल लासलगाव संपर्क प्रमुख कल्याणी कुलकर्णी व किशोर कुलकर्णी यांच्या हस्ते अभिषेक करण्यात आला. यावेळी या उभयंतांनी कै श्रीकृष्ण कुलकर्णी, कै संतोष जोशी, कै प्रकाश जोशी, गं.भा.कावेरी बुवा, गं.भा.वच्छला जोशी यांच्या स्मृती प्रित्यर्थ खुर्च्या व टेबल मंदिरास समर्पित करण्यात आले.समर्थ युवा मंडळ अध्यक्ष मयूर भंडारी यांनी कुलकर्णी परिवाराचे आभार मानले. यावेळी ब्राह्मण महासंघ विश्वस्त तथा मैत्रेयी महिला मंडळ अध्यक्ष स्मिता कुलकर्णी, संपर्क प्रमुख कल्याणी कुलकर्णी, सुजाता भंडारी, समर्थ युवाध्यक्ष मयूर भंडारी, ब्राह्मण सेवा मंडल विश्वस्त सदस्य आतिश कुलकर्णी, मंदीर व्यवस्थापक व पुजारी सुशील जोशी, सामाजिक कार्यकर्ते निलेश जगताप उपस्थित होते.

# सेंट्रल रेल्वे भुसावळ च्या डीव्हिजनल रेल्वे मॅनेजर ईती पांडेय यांची लासलगाव रेल्वे स्थानकास भेट

**लासलगाव । वार्ताहर**

सेंट्रल रेल्वे भुसावळ च्या डीव्हिजनल रेल्वे मॅनेजर श्रीमती ईती पांडेय यांनी लासलगाव रेल्वे स्थानक येथे भेट देऊन रेल्वे स्थानकाची पाहणी केली. लासलगाव रेल्वे स्थानकाचा अमृत भारत स्टेशन योजनेत समावेश झाल्याने येत्या काही दिवसात या रेल्वे स्थानकात सर्व प्रकारच्या सोयी - सुविधा निर्मिती करण्याच्या कामाला प्रत्यक्ष प्रारंभ होणार आहे.या कामाचे उद्घाटन १५ ऑगस्टला पंतप्रधान नरेंद्र मोदी हे व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे करणार आहेत.



वर्षभरात लासलगाव रेल्वे स्थानकाचे रूप पूर्णतः बदलणार आहे.यामुळे शहराच्या आर्थिक भरभराटीस चालना मिळणार आहे.

या वेळी ईती पांडेय यांचे स्वागत माजी जिल्हा परिषद सदस्य डी के जगताप,बाजार समितीच्या माजी सभापती सुवर्णा जगताप तसेच भाजप पदाधिकारी,प्रवासी संघटना,प्रवासी,नागरिक यांच्या तर्फे करण्यात आले.यावेळी कोरोना काळात रद्द झालेली देवगिरी एक्सप्रेस,जनता एक्सप्रेस,शालीमार या रेल्वे गाड्या पुन्हा कराव्या,पठाणकोट अमृतसर एक्सप्रेस ला थांबा मिळावा,कुर्ला एक्सप्रेस मनमाड पासून पूर्ववत चालू करावी आणि कांदा लोडिंग साठी कॉंक्रिटीकरण करण्यासंदर्भात मागण्या करण्यात आल्या. प्रवासी संघटनेतर्फे ही विविध मागण्यांचे निवेदन या वेळी श्रीमती पांडेय यांना देण्यात आले..

यावेळी प्रकाश दायमा, इडी के जगताप, सुवर्णा जगताप, बाजार समितीचे उपसभापती गणेश डोमाडे, राजाभाऊ चाफेकर, नितीन शर्मा, निलेश सालकाडे, बापू लचके, बबनराव शिंदे, थेटाळे च्या सरपंच शितल शिंदे, युवराज पाटील, राजेंद्र जाधव, सुनील नेवगे, ज्ञानेश्वर शिंदे, सुनील शिंदे, मनोहर खिलवाणी, भाऊसाहेब वाघ, गोपीनाथ उगले, भगवान बोराडे, राजू शेख, ऐश्वर्या जगताप, शैलजा भावसार, भारती महाले, योगिता आंबेकर, सोनाली शिंदे उपस्थित होते.

# सासरच्या छळास कंटाळून मुलीने आत्महत्या केल्याची वडिलांची तक्रार

**लासलगाव । वार्ताहर**

सासरच्या छळास कंटाळून विवाहितेने आत्महत्या केल्याची घटना निफाड तालुक्यातील भरवस येथे घडली.वैष्णवी किरण वावधाने ( वय २१) असे आत्महत्या केलेल्या विवाहितेचे नाव आहे.या प्रकरणी लासलगाव पोलिसांनी आत्महत्येस प्रवृत्त केल्याबद्दल सासरच्या पाच जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

सविस्तर वृत्त असे की,मयत वैष्णवी हिचे किरण प्रभाकर वावधाने यांच्याशी दि. ८ मे २०२० मध्ये लग्न झाले होते. लग्नानंतर काही महिने सुरळीत गेले.त्यानंतर मात्र सासरच्या मंडळींकडून वैष्णवी हिस शारीरिक आणि मानसिक त्रास देण्यास सुरुवात झाली.लग्नात भांडे दिले नाहीत तर कधी स्वयंपाक करता येत नाही यावरून तिला सतत त्रास दिला जात असे. गरोदरपणात गोठ्यात कामास लावणे,जड काम करण्यास भाग पाडले जात होते. डोहाळे जेवण घाला या मागणीवरून नवऱ्याने तिला हाताने,चापटीने मारहाण केली व शिवीगाळ केली. याबाबत तिने वडिलांना देखील सांगितले होते.परंतु अपत्य प्राप्तीनंतर सर्व सुरळीत होईल अशी समजूत तिच्या आई वडिलांनी घातली. अपत्य प्राप्तीनंतर देखील त्रास कमी न झाल्याने वैष्णवी ही सहा महिने माहेरी होती.

वैष्णवीचे मामे सासरे कैलास कुयटे रा.दावचवडी यांनी मध्यस्थी करत जबाबदारी घेतल्याने वैष्णवीला सासरी पाठविले.नंतर त्याचे वाटप होऊन चुली वेगळ्या करण्यात आल्या,मात्र शेती एकत्र असल्याने वाद होतच होते. वेळोवेळी शारीरिक व मानसिक छळ करून शिवीगाळ, मारहाण करत होते.त्यामुळे तीने सदर जाचाला कंटाळून माधव गणपत मानकर यांचे शेत गट नंबर ३९ मधील विहिरीत उडी मारून आत्महत्या केली अशी वैष्णवीचे वडील भारत रामनाथ बोचरे रा.देवगाव यांनी फिर्याद दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पती किरण प्रभाकर वावधाने, सासू जनाबाई प्रभाकर वावधाने,सासरा प्रभाकर गणपत वावधने,दिर सुनील प्रभाकर वावधाने,जाव प्रतीक्षा सुनील वावधाने या सासरच्या मंडळींविरोधात भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८ (अ), ३०६, ३२३, ५०४,५०६, ३४ या कलमान्वये लासलगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# श्री गणेश मूर्तिकार संघटनेचे मंत्री भुजबळांना साकडे

**नाशिक । प्रतिनिधी**

श्री गणेश मूर्तिकार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी नाशिक महापालिका क्षेत्रात प्लास्टर ऑफ पॅरीस मूर्त्तीच्या मूर्ती विक्री बाबत घातलेल्या बंदीबाबत राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांची नाशिक येथील कार्यालयात भेट घेतली.

यावेळी मंत्री छगन भुजबळ यांनी मनपा आयुक्त डॉ. अशोक करंजकर यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क करून शासनाच्या नियमावली प्रमाणे श्री गणेश मूर्तिकार मूर्ती विक्रीस परवानगी द्यावी अशा सूचना दिल्या. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष रंजन ठाकरे, युवक शहराध्यक्ष अंबादास खैरे, संघटनेचे अध्यक्ष संजय सोनार, भारत नवघिरे, ज्ञानेश्वर कोरडे, निलेश खैरनार, नाना नायकवाडे, गोपाल नागरे, सुशात मालवंडे यांच्यासह मूर्तीकार संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# के आजा तेरी याद आयी! 'स्वर - साधना' तर्फे रफींना स्वरांजली

**नाशिक । प्रतिनिधी**

सुरेल गायक मोहम्मद रफी यांच्या ४३ व्या स्मृतीदिनाच्या औचित्याने त्यांच्याच गाजलेल्या गीतांमधून आदरांजली अर्पण करण्यात आली. 'के आजा तेरी याद आयी' या गाण्याने

बहारदार सुवर्णकाळाची आठवण ताजी केली. रसिक श्रोत्यांनी उत्स्फूर्त दाद देत गाण्यांचा मनमुराद आनंद मिळवला.

काल शनिवारी ( दि.२९) स्मृतीदिनाच्या पूर्वसंध्येला स्वर - साधना म्युझिकल

इव्हेंट्सतर्फे 'मुड्स ऑफ रफी साहब' या संगीत मैफलीचे आयोजन करण्यात आले. संकल्पना माऊली मुळे यांची तर आयोजन प्रमोद कापडणे यांचे होते. प. सा.नाट्यगृहात ही विनामूल्य मैफल उत्तरोत्तर रंगत गेली. तुम जो





मिल गये हो, आये बहार बन के, रंग और नुर की बारात, कर चले हम फिदा अशा अनेक एकल गाण्यांबरोबरच युगलगीतेही सादर करण्यात आली. दिल तेरा दिवाना सनम, ये दिल तुम बिन कही या गाण्यांना श्रोत्यांचा भरभरून प्रतिसाद मिळाला.

गायक संजय अडावदकर, मयूर टुकडीया, माऊली मुळे यांना युगल गीतांमध्ये प्रीती दीक्षित, स्वाती जाधव, भाग्यश्री गायधनी, वर्षा संगम यांनी स्वरसाथ दिली. पाहुणे गायक व माऊली मुळे यांचे सांगितिक गुरु विवेक केळकर, प्रशांत जाधव, मनोज दीक्षित, संपदा पिंपळखरे यांनीही श्रोत्यांना सुरेल श्रवणानंद दिला. अखेरीस रफींच्या लोकप्रिय गाण्यांची श्रृंखला सादर करण्यात आली. त्यावर श्रोत्यांनी ताल धरला. ज्ञानेश वर्मा यांनी आठवणी, किस्से सांगून मैफलीत रंग भरले. स्वाती पवार व गोविंद चंदे यांनी सहकार्य केले. मैफलीची सांगता भाग्यवान श्रोत्यांना भेटवस्तू देऊन करण्यात आली.

# लासलगाव येथे मोहरम निमित्त सरबत(सबील)वाटप

**लासलगाव । वार्ताहर**

लासलगाव येथील सुलतान ए हिंद ग्रुप व ब्राम्हणगाव येथील ग्रीन टायगर ग्रुपच्या वतीने मोहरम निमित्त सरबत(सबिल) वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला.याप्रसंगी मुस्लीम युवकांनी मोहरमनिमित्त हिंदू-मुस्लिम बांधवांना सरबत वाटून मानवतेचा व शांततेचा संदेश दिला.

इस्लाम धर्माचे संस्थापक मोहंमद पैगंबर यांना व त्यांच्या मानवता व नैतिकतेच्या तत्वांना स्मरण करून पैगंबर साहेबांचे नातू हजरत इमाम हसन व हजरत इमाम हुसैन तसेच त्यांच्या नातेवाईकांनी



यसजीद नावाच्या राजाच्या अन्याय,अत्याचाराविरुध्द लढा दिला तसेच बगदाद येथील करबला येथे यसजीद या हुकूमशहाच्या अत्याचाराविरुद्ध लढताना हजरत इमाम हुसेन हे शहीद झाले होते.तो महिना मोहरमचा होता.या युद्धात हजरत इमाम हुसेन यांना पंधरा दिवस पाणी मिळाले नव्हते.

हजरत इमाम हुसैन यांनी केलेल्या त्याग आणि बलिदानाची आठवण म्हणून मोहरम साजरा केला जातो व त्यांच्या स्मृतिनिमित्त सरबत वाटप करण्याची परंपरा आहे.या वेळी लासलगाव येथील सुलतान ए हिंद ग्रुप व ब्राम्हणगाव येथील ग्रीन टायगर ग्रुप चे कार्यकर्ते तसेच हिंदू व मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## न्यूज कॉलम

### कर्डक यांची चैत्यभूमी स्मृती स्थळाला भेट

**नाशिक ।** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश सामाजिक न्याय विभागाच्या प्रदेश कार्याध्यक्षपदी बाळासाहेब कर्डक यांची नियुक्ती झाल्यानंतर त्यांनी मुंबईत दादर चैत्यभूमी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीस्थळाला भेट देऊन अभिवादन केले. यावेळी रवि वाघ, नितीन चंद्रमोरे, ड.प्रतीक कर्डक, मनोज वाघ, अनिल नळे, मोहन तांबे, धरम शिंदे, नितीन जाधव, ॲड. सुदीप निकम, नितीन जीवडे, नाना शिंदे, विशाल तांबे, सागर निकम यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### लायन्स क्लब धुळे तर्फे वृक्षारोपण

**धुळे ।** कारगिल दिनानिमित्त लायन्स क्लब धुळे आणि किंग्ज इंडस्ट्रीज धुळे मिळून औद्योगिक वसाहत धुळे येथील किंग्स इंडस्ट्री मधील सर्व कर्मचाऱ्यांच्या हस्ते नुकतेच वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी किंग्स इंडस्ट्रीचे मालक घनश्यामजी गिंदोडिया, सिद्धार्थ गिंदोडिया लायन्स क्लब चे अध्यक्ष आश्विन दाते, माजी प्रांतपाल नितीनजी बंग, चेतनजी बरडीया, सुनीलजी कानुगो, तसेच अन्य पदाधिकारी व लायन्स क्लब सदस्य उपस्थित होते. यावेळी लायन्स क्लब तर्फे कंपनीतील साडेतीनशे कामगारांच्या हातून प्रत्येकी एक झाड नावा सहित लावण्यात आले आणि सर्व कर्मचार्यां तर्फे आपण लावलेल्या झाडाची काळजी घेण्यात यावी असे आवाहन करण्यात आले.

## धोंड्याच्या महिन्यामुळे जावईबापू जोमात!

**धुळे । प्रतिनिधी**

दान-धर्मासाठी शुभ असणार्या आणि जावईबापूंच्या स्वागताचा अधिक (धोंड्याच्या) महिन्याला सुरुवात झाली आहे. त्यामुळे धार्मिक उपक्रमासह आंबारस व जावयांना वस्तू भेट देण्याची रेलचेल सर्वच ठिकाणी दिसत आहे. धुळ्यातील पुरुषोत्तम पाटील यांनी देखील यांनी आपला भाचा संकल्प महानोर यांना धोंडानिमित्ताने आग्रहाचे आमंत्रण दिले. भाच्यांना वाण देखील यावेळी लावला.



तीन वर्षातून एकदा येणारा हा अधिक मास म्हणजेच पुरुषोत्तम मास पर्वकाळ 'हाय-फाय' जमान्यामध्ये या महिन्याचे महत्व तसूभरही कमी झालेले नाही. या महिन्यात जावईबापूंची चांगलीच बडदास्त ठेवली जाते. त्यांना सासरी बोलावून सोने, तांबे, चांदीच्या वस्तू दान म्हणून दिल्या जात आहेत. त्यांच्यासाठी पंचपक्वान्नाचे जेवण ठेवले जाते. या महिन्याध्ये पुरणाचे दिंड करून मित्रांना वाटले जातात. तसेच पुरणपोळीचे जेवणही दिले जाते. पुरणाच्या दिंडांना 'धोंडा' असे म्हटले जाते. त्यामुळे हा महिना धोंड्याचा महिना म्हणूनही ओळखला जातो. गेल्या महिन्यातच लग्न झालेल्यांना अधिक महिन्यामुळे सासर्याच्या पाहुणचाराची नामी संधी मिळाली आहे.

या महिन्यात हिंदू धर्म पद्धतीनुसार मुली व जावईबापूंना लक्ष्मी नारायणाचा जोडा संबोधला जातो. जावई हा विष्णुचे प्रतीक, तर त्याची पत्नी अर्थात आपली कन्या ही लक्ष्मी समान असल्याने अधिक महिन्यात त्यांचे पूजन केले जाते. त्यांना सन्मान पूर्वक बोलावून अनारसे, बत्तासे, म्हैसूरपाक वड्या, घिवर, नारळ, सुपार्या आदी ३३ इतक्या संख्येचे चांदी किंवा तांब्याच्या ताटात दिवा लावून, कुंकू लावून हे दान लेक-जावयांना दिले जाते. त्यामुळे या संपूर्ण अधिकासात घरोघरी जावई, लेकी, भाचे कंपनी यांच्या मान सन्मानाची लगबग सुरु होत असल्याची दिसुन येत आहे. जावयासह सर्व घरातील सदस्यांना बोलावून त्यांना मिष्टान्न भोजन, दिमाखदार पोशाख, जावयाला एखादी मौल्यवान भेटवस्तू देताना सासर्याचा खिसा पुरता रिकामा झाला आहे . मात्र लाडक्या लेकीसाठी बापाला या खर्चाची तमा नसते. त्यामुळे सध्या बाजारपेठेतही चांगलीच उलाढाल होत आहे. ऋण काढून सण करण्यासाठी का होईना पण सासरे मंडळींनी कंबर कसली असून जावई मात्र खुश आहेत.

## नाशिकमार्गे जाणाऱ्या मुंबई-नागपूर बुलेट ट्रेनचे काम लवकर सुरु करा

### खा. हेमंत गोडसे यांची रेल कॉर्पोरेशनकडे मागणी

**नाशिक । प्रतिनिधी**

मुंबई-नागपूर बुलेट ट्रेनमुळे नाशिकसह राज्यातील सुमारे अकरा जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळणार असून या विषयीचा डीपीआर वर्षभरापूर्वीच तयार झालेला आहे. मुंबई-नागपूर बुलेट ट्रेनमुळे प्रवाशांचा प्रवासाचा वेळ निम्म्याहून अधिक कमी होणार असून ट्रेनमुळे दहा जिल्ह्यांची कनेक्टिव्हिटी वाढणार आहे. नाशिकमार्गे जाणारा मुंबई-नागपूर बुलेट ट्रेन प्रकल्प राज्याच्या विकासासाठी एक वरदानच ठरणार आहे. प्रस्तावित रेल्वे मार्गाला केंद्राकडून मान्यता मिळवून लवकरात-लवकर प्रकल्पाच्या कामाला प्रारंभ करावा, अशी आग्रही मागणी खा.



हेमंत गोडसे यांनी नॅशनल हायस्पीड रेल कार्पोरेशन लिमिटेडचे सीएमडी प्रसाद यांच्याकडे केली आहे.

मुंबई-नागपूर प्रवास रेल्वे मार्गाने जलद गतीने व्हावा यासाठी विशेष बुलेट ट्रेन रेल्वे मार्ग तयार करावा अशी मागणी सतत राज्यभरातील रेल्वे प्रवाशांकडून केंद्र शासनाकडे होत होती. यातूनच पंतप्रधान मोदी यांनी देशभरात सात ठिकाणी बुलेट ट्रेन प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेतला असून यामध्ये मुंबई-नागपूर बुलेट ट्रेन प्रकल्पाचा समावेश करण्यात आलेला आहे. गेल्या वर्षभरापूर्वी मुंबई-नागपूर बुलेट ट्रेन मार्गाचे सर्वेक्षण करण्यात आलेले असून या प्रकल्पाचा डीपीआरही पूर्ण झालेला आहे. असे असले तरी सदर प्रकल्पास आजमितीस केंद्राकडून अंतिम मान्यता मिळालेली नसून याविषयीचा प्रस्ताव शासन दरबारी प्रलंबित आहे.

बुलेट ट्रेनचा विषय मार्गी लागावा यासाठी काल खा. गोडसे यांनी दिल्लीत जात नॅशनल हायस्पीड रेल कार्पोरेशन लिमिटेडचे सीएमडी प्रसाद यांची भेट घेतली. मुंबई-नागपूर बुलेट ट्रेनमुळे नाशिकसह अकरा जिल्हा एकमेकांना जोडले जाणार असून यामुळे पर्यटनासह विकासाला मोठी चालना मिळणार आहे. यावेळी खा.गोडसे यांनी प्रसाद यांच्याकडून यापूर्वी मुंबई-नागपूर बुलेट ट्रेन संदर्भातील तयार करण्यात आलेल्या डीपीआरची सविस्तर माहिती घेतली. मुंबई-नागपूर बुलेट ट्रेन राज्याच्या विकासासाठी वरदान असून केंद्र शासनाकडून प्रकल्पाला लवकरात लवकर मान्यता घेऊन प्रकल्पाचे काम सुरू करावे अशी मागणी खा. गोडसे यांनी प्रसाद यांच्याकडे केली आहे. या ट्रेनचा मार्ग नागपुर, वर्धा, पुरगांव, करंजा, मेहेकर, जालना, औरंगाबाद, शिर्डी, नाशिक, इगतपुरीमार्गे सीएसटी असा असणार असल्याची माहिती खा.गोडसे यांनी दिली आहे.

## श्री गणपुले दत्त मंदिरात दत्त याग कार्यक्रमाचा समारोप

**धुळे । प्रतिनिधी**

धुळ्यातील खोल गल्लीतील प्राचीन काळापासून असलेल्या श्री गणपुले दत्त मंदिरात अधिक श्रावण महिन्याच्या मंगलमय पर्वाच्या निमित्ताने अलौकिक दिव् यज्ञीय अनुष्ठान असणार्या पाच दिवसांच्या भव्य श्री दत्त याग कार्यक्रमाचे आयोजन सोमवार दि चोवीस जुलै पासून करण्यात आले होते त्याचा काल धार्मिक वातावरणात मोठ्या संख्येने उपस्थित भाविकांच्या उपस्थितीत उत्साहात पूर्णाहुती ने समारोप झाला.

पाच दिवसांच्या या सोहळ्यात गणपती पूजन, श्री दत्त गुरूंना रुद्राभिषेक, पुण्य हवचन, तुलसी पत्र, बिल्वपत्र, पुष्प अर्पण करण्यात आले तसेच तीन दिवस यज्ञकुंडात हवन विधी करण्यात आले. पंचवीस चौरसफूट जागेत ब्रह्मवृंदांनी भव्य दत्त भद्र मंडल आकर्षक रित्या साकारले. या कार्यक्रमात दत्तात्रेय प्रभू, प पू नृसिंह सरस्वती स्वामीं आळंदी, प पू केशवदत्त महाराज सोनगीर व कै बळवंत वामन गणपुले यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. शहरातील सुपरिचित पुरोहित हेमंत उर्फ बाळू जोशी गुरुजी यांनी अकरा ब्रह्मवृंदां सह दत्त याग कार्यक्रमाचे पौरोहित्य केले. मंदिराचे जेष्ठ विश्वस्त श्री आनंद कुलकर्णी यांनी सपत्नीक सोहळ्यात मुख्य यजमान म्हणून सहभाग घेतला. या सोहळ्यास गुरुवर्य हभप डॉ मुकुंदराज महाराज यांचे विशेष आशिर्वाद लाभले तसेच दत याग सोहळ्यात मठाधिपती हभप श्री भाऊ महाराज रुद्र, जेष्ठ वास्तु विशारद मा रावसाहेब रविजी बेलपाठक, जेष्ठ सनदी लेखापाल श्री श्रीराम देशपांडे, जेष्ठ पुरोहित श्री रमेश कुलकर्णी गुरुजी, बापूसाहेब शिवाजी राव देवरे अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ हितेंद्र पाटील यांची सायं आरतीस विशेष उपस्थिती लाभली. दुपारी पूर्णाहुती नंतर झालेल्या महाप्रसादासाठी मंदिरात मोठ्या संख्येने उपस्थित भाविकांनी हजेरी लावली. मा रवीजी बेलपाठक यांच्या मार्गदर्शनाखाली विश्वस्त मंडळा तर्फे साकारण्यात आलेल्या भव्य प्रवेश द्वार कामाची सर्वांनी प्रशंसा केली.

श्री गणपुले दत्त मंदिर संस्थान चे अध्यक्ष शरदचंद्र देशपांडे, कार्याध्यक्ष कु धनश्री गरुड, उपाध्यक्ष अनुप बनछोड, कोषाध्यक्ष सागर देशपांडे, विश्वस्त आनंद कुलकर्णी, अभय शेंद्रे, व्यवस्थापक माधव बापट यांनी सोहळा यशस्वीपणे संपन्न होण्यासाठी परिश्रम घेतले.



## ह्युमन बिंग फाउंडेशनचा इंजिनीअरिंगच्या विद्यार्थिनीला मदतीचा हात

### मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते मदतीचे वाटप

**नाशिक । प्रतिनिधी**

ह्युमन बिंग फाउंडेशनच्या वतीने नाशिकमध्ये इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थिनीला महाविद्यालयाची प्रलंबित असलेली फी भरण्यासाठी आर्थिक मदत देण्यात आली. नाशिक येथील कार्यालयात राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते विद्यार्थिनीला धनादेशाचे वाटप करण्यात आले.

यावेळी ह्युमन बिंग फाऊंडेशनचे अकील खान, नदीम मनियार, विनय पांडे, आसिफ खान, वाजिद पठाण, मीर खान, अब्दुलनबी खान, रामेश्वर साबळे यांच्यासह ह्युमन बिंग फाऊंडेशनचे सर्व पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

## दुध भेसळ रोखण्यासाठी संयुक्तीक कारवाई करावी : अपर जिल्हाधिकारी केकाण

**धुळे ।** धुळे जिल्ह्यात दूध भेसळ रोखण्याकरीता पोलिस प्रशासन, अन्न व औषध प्रशासन तसेच जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी यांनी समन्वय साधुन संयुक्तीक कार्यवाही करण्याच्या सूचना अपर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण यांनी दिल्या आहेत.

दुध भेसळ रोखण्यासाठी जिल्हास्तरीय समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाली. बैठकीस अपर पोलिस अधिक्षक किशोर काळे, अन्न व औषध प्रशासनाचे सहायक आयुक्त (अन्न), संतोष कांबळे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. आर. एम. शिंदे, जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, डॉ. अमित पाटील,उपनियंत्रक वैध मापन शास्त्र कार्यालयातील श्री, दलाल, विस्तार संकलन प्रितेश गोंधळी आदी उपस्थित होते. यावेळी श्री.केकाण म्हणाले की, जिल्ह्यांत आगामी सण,उत्सवांच्या काळात दुध तसेच दुग्धजन्य मिठाई, इत्यादी खाद्य पदार्थांत मोठ्या प्रमाणात भेसळ केली जात असते. त्यामुळे सण, उत्सवांच्या काळात दुधविक्रेत्यांच्या दुकानातून तसेच विविध नामांकित दुध डेअरीच्या पिशवीबंद दुध ब्रॅन्ड (अमुल, राजहंस, विकास वगैरे) दुधात होणारी भेसळ रोखण्यासाठी पोलीस प्रशासन, अन्न व औषण प्रशासन आणि जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकाऱ्यांनी संयुक्त कारवाई करावी.

## शिरपूर तालुक्यासाठी ५५ कोटी मंजूर : आमदार अमरिशभाई पटेल, काशिराम पावरा यांचा पाठपुरावा

**शिरपूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील रस्ते व पुलांसाठी ५५ कोटी ३४ लाखांच्या निधीस पाठपुराव्याअंती मंजुरी मिळाल्याची माहिती आमदा अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम पावरा यांनी दिली. शासनाच्या पुरवणी अर्थसंकल्पात विशेष रस्ते दुरुस्ती कार्यक्रम, आदिवासी व बिगर आदिवासी क्षेत्रातील विविध रस्ते व पुलांसाठी निधी मंजूर झाला.

त्यातून होणारी कामे अशी : बिगर आदिवासी क्षेत्र (राज्य महामार्ग) : पळासनेर, हाडाखेड, दहिवद, नरडाणा रोड रुंदीकरण- २ कोटी ४० लाख रुपये, थाळनेर-भाटपुरा- नागेश्वर रोड दुरुस्तीसाठी- २ कोटी ५० लाख, पळासनेर, हाडाखेड, दहिवद, नरडाणा रोड दुरुस्ती- १ कोटी, थाळनेर- भाटपुरा-नागेश्वर रोड काँक्रिटीकरण- २ कोटी, एकूण- ७ कोटी ९० लाख. जिल्हा रस्ते : एसएच ४ ते अजनाड- जापोरे- २ कोटी, होळ ते बभळाज सुधारणा- ३ कोटी, एसएच ४ ते अहिल्यापूर- वाठोडे- जैतपूर- कुरखळी- सावळदे सुधारणा- २ कोटी, होळनांथे- मांजरोद ते जिल्हा बॉर्डर- १ कोटी १० लाख, सावळदे- उंटावद रोडवर अरुणावती नदीवर पूल बांधकाम- ११ कोटी, एसएच- १ ते बुडकी- चांदसूर्या- वासर्डी- बलकुवा- अर्थे, एसएच-४, भरवाडे- टेंभे रोड, एमडीआरपर्यंत सुधारणा- १ कोटी ७५ लाख, गुऱ्हाळपाणी- बोराडी- निमझरी- शिरपूर ते एसएच ४ रोड, एमडीआरपर्यंत सुधारणा- १ कोटी २५ लाख, एकूण जिल्हा रस्त्यासाठी २२ कोटी १० लाख. आदिवासी भागासाठी मंजूर रस्ते कामे : हिसाळे- महादेव रोड- मलखाननगर - ४ कोटी ५० लाख, सुळे ते नटवाडा - १ कोटी, हिसाळे एमडीआर- ९ ते अनेर डॅम- मलखान नगर रोड संरक्षण भिंतीसह - ९० लाख, गुऱ्हाळपाणी- बोराडी- निमझरी- शिरपूर रोड - १ कोटी ३० लाख, बुडकी- चांदसूर्या- नांदर्डे- चांदसे- अर्थे रोड- १ कोटी ५० लाख, जळोद- तराड कसबे- भटाणे- जवखेडा- अंतुर्ली रोडवर पूल- १ कोटी ५० लाख, बोरपाणी- फत्तेपूर- मुखेड रोड- १ कोटी २५ लाख, बुडकी- चांदसूर्या- नांदर्डे- चांदसे- अर्थे रोड- १ कोटी ५० लाख, जळोद- तऱ्हाडकसबे- भटाणे- जवखेडा- अंतुर्ली रोड- १ कोटी ५० लाख, हातेडजवळ रस्ता दुरुस्ती व पूल- २ कोटी रुपये, संरक्षक भिंतीसह जळोद- तराड कसबे- भटाणे- जवखेडा- अंतुर्ली रोड- १ कोटी, एमडीआर ७० ते पारशीपाडा- वरझडी- हिंगोणी- पिंपराडपाडा- वरझडीपर्यंत सुधारणा- ७५ लाख, वरझडी- हिंगोणी- पिंपराडपाडा- हिंगोणीपाडापर्यंत सुधारणा- १ कोटी, एमडीआर ६४ ते अंबडपाडा- १ कोटी, आदिवासी क्षेत्रासाठी एकूण २० कोटी ४५ लाखांचा निधी मंजूर झाला आहे.

### नाबार्डकडूनही कामे मंजूर

**नाबार्डतर्फे शिरपूर तालुक्यात जातोडे- वाणवा- चांदपुरी- अर्थे रोडवर लहान पुलासाठी २ कोटी ९५ लाख, तसेच अन्य पुलासाठी, बोराडी-न्यू बोराडी- उमरदे- वकवाड रोडसाठी १ कोटी ९३ लाख ६९ हजार, असा एकूण ४ कोटी ८९ लाख ६ हजाराचा निधी मंजूर झाला आहे. तालुक्यास भरीव निधी मिळाल्याने समाधान व्यक्त होत आहे.**

## शिरपूरात भाजपाची मन की बात, टिफीन बैठक के साथ संपन्न

**शिरपूर । प्रतिनिधी**

येथील आमदार संपर्क कार्यालयात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा 'मन की बात' हा संवाद कार्यक्रम ३० जुलै २०२३ रविवार रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष आ. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचनेनुसार आणि माजी मंत्री आ. अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात संपन्न झाला.

मन की बात हा कार्यक्रम शिरपूर विधानसभा मतदारसंघात धुळे भाजपा जिल्हाध्यक्ष तथा मन की बात कार्यक्रम उत्तर महाराष्ट्र विभागीय संयोजक बबनराव चौधरी, आ. काशिराम पावरा यांनी मन की बात टिफीन बैठक के साथ कार्यक्रम पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक यांच्या सोबत संपन्न झाला.



देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी देशाला व कार्यकर्तांना उद्देशुन मन की बात या कार्यक्रमातून ३० जूलै २०२३ रविवार रोजी सकाळी ११ वाजता संबोधन केले. यावेळी धुळे जि. प. उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, भाजपा जिल्हा सरचिटणीस अरुण धोबी, जिल्हा उपाध्यक्ष के. डी. पाटील, तालुकाध्यक्ष किशोर माळी, जि. प. समाज कल्याण समिती सभापती कैलास पावरा, भाजपा तालुका सरचिटणीस मंगेश भदाणे, तालुका उपाध्यक्ष भास्कर बोरसे, शहर सरचिटणीस महेंद्र पाटील, शहर उपाध्यक्ष प्रशांत चौधरी, शहर चिटणीस राधेश्याम भोई, शिरपूर कृउबा समिती संचालक मिलिंद पाटील, माजी संचालक ॲड. प्रतापराव पाटील, युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष राज सिसोदिया, शहराध्यक्ष विक्की चौधरी, तालुका उपाध्यक्ष मनजित पवार, मन की बात कार्यक्रम सहसंयोजक अजिंक्य शिरसाठ, आमोदा माजी सरपंच जगदिश देशमुख, किसान मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष सुभाष राजपूत, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सक्रीय कार्यकर्ते संदीप माळी, भालेराव माळी, राहुल माळी, देविदास माळी, धिरज देशमुख, संजु पावरा, सतीष पाटील, यश भामरे, जगन्नाथ पाटील आदि भाजपा पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, शक्तिकेन्द्र प्रमुख, बूथ प्रमुख, मोर्चा, आघाडी पदाधिकारी व कार्यकर्ते, नागरिक या कार्यक्रमात सहभागी झाले होते. तसेच झालेल्या कार्यक्रमाचे फोटो तात्काळ भाजपाच्या सरळ पवर डाऊनलोड करण्यात आले. प्रत्येक वेळी मन की बात कार्यक्रमातून आपल्याला एक नवा अनुभव अनुभवायला मिळतो. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आपल्याला देशाची, देशाच्या संस्कृतीची, देशाच्या संकल्पांची आणि देशाच्या कामगिरीची प्रत्येक वेळी नव्या दृष्टिकोनातून ओळख करून देत असतात असे जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी, आ. काशिराम पावरा यांनी यावेळी सांगितले.

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था
Admission Open
विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे
NAAC Accredited 'B' Grade – वडेल रोड, एमएसईबी जवळ, वलवाडी, धुळे
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगाव, कोड नं. 200111
B.Sc. | B.C.A | M.M.S./M.C.M.
डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्यांना S.Y.B.Sc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत
संपर्क: प्रा.ललिता निकम: 8862044791, प्रा.जागृती पाटील: 7887934365
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक कोड नं. 5299A
B.A., B.C.A, B.Sc., M.A., M.C.A., M.B.A.
सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल.
प्रा.हर्षल पाटील: 9421283577, श्री.नितेश पाटील: 9922116438, प्रा.भूषण पाटील: 7709100798
शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. मुंबई संलग्नीत कोड नं.2053
P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology
पात्रता – बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुऑलॉजी, मायक्रो बायोलॉजी/ बी.फार्म/बी.ए.एम.एस./बी.डी.एस./एम.बी.बी.एस.
संपर्क : प्राचार्य डॉ.के.बी.पाटील – 9422288518, सौ.शारदा पाटील – 9423496344
प्राचार्य डॉ.आर.बी.पवार: 9420375735,
प्रा.डॉ.योगेश बोरसे: 9423378936, श्री. हर्षल पाटील: 9421283577